JM

Johnson Matthey
Inspiring science, enhancing life

# लाचखोरी आणि भ्रष्टाचार विरोधी धोरण

जागतिक

आवृत्ती 2.0

एक जेएम धोरण समितीद्वारे स्वीकृत

24 जुलै 2019 रोजी

JM

## अनुक्रमणिका


1 उद्देश 3

2 उपयुक्तता/ व्याप्ती 3

3 धोरण 4

A. लाचखोरी विरोधी सामान्य प्रतिबंध 4

B. सरकारी अधिकाऱ्यांना लाच देण्याविरूद्ध प्रतिबंध 4

C. सुविधांचे पेमेंट करणे 5

D. भेटवस्तू, आदरातिथ्य आणि धर्मादाय देणगी धोरणाच्या अनुपालनाची आवश्यकता 5

E. राजकीय योगदानांविरूद्ध प्रतिबंध 5

F. टीपीआयसोबत सहभागी होताना आणि पेमेंट करतानाच्या आवश्यकता 5

G. वास्तविक किंवा संशयित उल्लंघने किंवा धोक्याच्या शक्यता (रेड फ्लॅग्ज) विषयी अहवाल देण्याची आवश्यकता 5

4 अपवाद 5

5 दायित्वे आणि जबाबदाऱ्या 6

6 महत्त्वाची नियंत्रणे 8

7 उल्लंघनांचे परिणाम 9

8 संदर्भ 9

9 धोरणाचा मालक 10

10 दस्तऐवज नियंत्रण (Document Control) 10

11 व्याख्या 10

परिशिष्ट 1 धोक्याच्या शक्यता (रेड फ्लॅग्ज) 13

JM

## 1 उद्देश

जॉन्सन मॅथेचे ("जेएम", "आमचे", "आम्ही", "आम्हाला") लाचखोरी व भ्रष्टाचार ("एबीसी") धोरण लाचलुचपत आणि भ्रष्टाचारासाठी आमचा **शून्य सहिष्णुता दृष्टीकोन स्थापन करते.** हे धोरण जेएमच्या भेटवस्तू, आदरातिथ्य आणि धर्मादाय देणगी ("जीएच अँड सी") या जागतिक धोरणासह वाचले जावे.

आम्ही, आमचे कर्मचारी आणि आमचे सहयोगी तृतीय पक्ष, आम्ही जागतिक स्तरावर काम करीत असलेल्या सर्व देशांमधील अनेक लाचखोरी आणि भ्रष्टाचाराच्या ("एबीसी") कायद्यांच्या अधीन आहोत, यात मर्यादेशिवाय यू. के. लाचखोरी अधिनियम 2010 ("यूकेबीए") आणि यू. एस. विदेशी भ्रष्टाचार प्रथा अधिनियम ("एफसीपीए") यांचा समावेश आहे, हे दोन्ही कायदे जगात कोठेही केलेल्या कृतीस लागू होऊ शकतात. एबीसी कायद्यांचे उल्लंघन जगभरातील अंमलबजावणी प्राधिकरणांद्वारे अत्यंत गंभीरपणे हाताळले जाते आणि याचा परिणाम म्हणून जेएम आणि यात सामील कोणत्याही व्यक्तींना कठोर फौजदारी, दिवाणी आणि नियामक दंड ठोठावले जाऊ शकतात. फौजदारी दंडा मधे मोठा आर्थिक दंड आणि तुरूंगवास असू शकतो.

लाचखोरी किंवा भ्रष्टाचारात जेएमचा सहभाग किंवा कथित सहभागामुळे आमची प्रतिष्ठा लक्षणीय प्रमाणात डागाळली जाऊ शकते आणि आमच्या कामगार, ग्राहक आणि आम्ही ज्या समुदायांत काम करतो त्या समुदायांमध्ये आम्ही स्थापित केलेल्या विश्वासाला तडा जाऊ शकतो.

आमच्या व्यावसायिक कार्यांच्या स्वरूपानुसार आम्हाला लाचखोरी आणि भ्रष्टाचाराच्या जोखमीस सामोरे जावे लागेल जी कमी केली जाणे आवश्यक आहे. आमचे कार्य जगभरात पसरले आहे, ज्यात लाचखोरी व भ्रष्टाचाराच्या दृष्टिकोनातून उच्च-जोखीम असणाऱ्या देशांचा आणि उद्योगांचा समावेश आहे. शक्यता सरकारी अधिकाऱ्यांशी संवाद साधताना वाढते, ज्यामध्ये आम्ही सरकारी मालकीच्या संस्थांसोबत काम करण्याचाही समावेश आहे. याव्यतिरिक्त, जेव्हा आम्ही तृतीय पक्षाच्या मध्यस्थांना ("टीपीआय") आमच्या वतीने कार्य करण्यास नियुक्त करतो, तेव्हा त्यांच्या कृती किंवा संभाव्य गैरवर्तन आम्हाला अशा कृती किंवा गैरवर्तनाची माहिती नसतानाही आमच्यावर उत्तरदायित्व निर्माण करू शकते.

तुम्ही या धोरणाचे, लागू असलेले सर्व कायदे (स्थानिक एबीसी कायद्यांसह) आणि तुमच्या क्षेत्र किंवा समूह कार्यद्वारे लागू केलेल्या कोणत्याही अतिरिक्त आवश्यकतांचे अनुपालन करणे आवश्यक आहे. जर या धोरणाच्या आवश्यकता व तुमचे क्षेत्र किंवा समूह कार्यचे धोरण आणि स्थानिक कायद्यांमध्ये जर विरोधाभास असेल तर तुम्ही सर्वात कठोर आवश्यकतांचे अनुपालन करणे आवश्यक आहे.

**या धोरणाचा आढावा घेताना, तुम्ही कलम 11 मध्ये नमूद केलेल्या व्याख्यांचा संदर्भ घ्यावा.**

जॉन्सन मॅथे पीएलसीचे संचालक मंडळ आणि त्यांची समूह व्यवस्थापन समिती ("जीएमसी") या धोरणाशी आणि तुम्ही त्याचे पालन करतांना पाठिंबा देण्यास पूर्णपणे वचनबद्ध आहेत.

## 2 उपयुक्तता/ व्याप्ती

### या धोरणात काय समाविष्ट आहे?

हे धोरण लाचखोरी आणि भ्रष्टाचारात सहभागी होणे टाळण्यासाठी तुमच्यासाठी आवश्यक असलेले सिद्धांत आणि आवश्यकतांचे निर्धारण करते.

**लाचखोरीमध्ये** कुणाही व्यक्तीला त्याचे काम करण्यासाठी किंवा करवून घेण्यासाठी अयोग्य कृती करण्यास किंवा कुणालातरी प्रभावित करण्यास आमिष किंवा पुरस्कार म्हणून पैसे, मूल्यवान वस्तू किंवा इतर कशाचाही प्रस्ताव देणे, विनंती करणे किंवा पैसे घेणे यांचा समावेश होतो. लाचखोरीच्या जोखमीचे मूल्यांकन करण्याच्या उद्देशाने "**एक अयोग्य कृती**" म्हणून सामान्यपणे कुणीतरी असे कार्य किंवा कृती करण्याकडे (किंवा करण्यात अयशस्वी राहणे) निर्देश केला जातो जी बेकायदेशीर, अनैतिक, चुकीच्या उद्देशाने किंवा विश्वासभंगाच्या स्वरूपात केली जाते. लाचेला काही वेळा "किकबॅक्स" सुद्धा म्हटले जाते. "**मूल्य असलेले काहीही**" ज्यात मर्यादेशिवाय खालील गोष्टींचा समावेश आहे:

- भेटवस्तू (रोखीच्या समतुल्य जसे की भेटवस्तू कार्ड किंवा व्हाउचर)
- अनुकूल व्यावसायिक व्यवस्था (उदा. अनुकूल करार)
- आतिथ्य, जसे की जेवण, हॉटेलमध्ये मुक्काम, तिकिटे किंवा क्रीडा किंवा सांस्कृतिक कार्यक्रमांना आमंत्रणे
- इतर प्रमोशनल खर्च (जसे की प्रवास आणि निवास खर्च)

JM

- प्राप्तकर्त्यास मूल्य असणारी मेहेरनजर (जसे की नोकरीचा प्रस्ताव, थेट सहभागी पक्षासाठी किंवा पक्षाच्या एखाद्या नातेवाईकासाठी कार्यानुभव किंवा इंटर्नशिपचा प्रस्ताव)
- कंपनी सेवा, सुविधा किंवा मालमत्तेचा विनामूल्य वापर
- राजकीय योगदाने
- धर्मादाय देणग्या

**भ्रष्टाचार** म्हणजे खासगी फायद्यासाठी सरकारी कार्यालय किंवा अधिकारांचा गैरवापर किंवा व्यवसायाच्या संबंधात खाजगी अधिकारांचा गैरवापर होय. भ्रष्टाचार अनेक स्वरूपात असू शकतो जसे की  फसवणूक, खंडणी, लाचखोरी किंवा सुविधांचे पेमेंट इ.

**सुविधांच्या पेमेंटला** कधी कधी "ग्रीस पेमेंट" म्हणूनही ओळखले जाते, जे असे अनधिकृत पेमेंट किंवा भेटवस्तू असतात जे एखाद्या सरकारी अधिकाऱ्याकडून अविवेकी सरकारी कृती किंवा प्रक्रिया वेगाने किंवा सुविधाजनक पद्धतीने करवून घेण्यासाठी दिले जाते. या सरकारी कृती किंवा प्रक्रियेत मर्यादेशिवाय परवाने किंवा परवानग्या देणे, वेळापत्रकांचे नियोजन आणि माल लोड / अनलोड करण्यासह इतर अनेक गोष्टींचा समावेश होतो.

### हे धोरण कोणास लागू होते?

हे धोरण आमच्यासाठी स्थायी किंवा तात्पुरत्या तत्वावर काम करणाऱ्या प्रत्येकावर लागू होते, मग अन्यथा निर्दिष्ट केल्याशिवाय ते आमच्या कोणत्याही समूह व्यवसायात, जगभरात कुठेही काम करत असतील, यात सर्व कर्मचारी, ठेकेदार आणि तात्पुरता कर्मचारी वर्ग (एकत्रितपणे, "कामगार") यांचा समावेश आहे.

आमच्या वतीने काम करणाऱ्या किंवा जेएमला सेवा प्रदान करणाऱ्या सर्व व्यक्ती, व्यक्तींचे समूह आणि संस्थांना आमच्या कामगारांप्रमाणेच नैतिक मानकांचे पालन करणे आवश्यक आहे, ज्यात मर्यादेशिवाय एजेंट, वितरक, पुनर्विक्रेते, वाहतूक पुरवठादार आणि सरकारी मध्यस्थ (एकत्रितपणे, "टीपीआय") यांचा समावेश होतो.

## 3 धोरण

हे धोरण **लाचखोरी आणि भ्रष्टाचाराविषयी आमची शून्य-सहिष्णुता दर्शविते**. तुम्ही सर्व वेळ आणि तुमच्या कार्याच्या सर्व बाबींमध्ये खाली दिलेल्या नियमांचे पालन करणे आवश्यक आहे.

हे धोरण प्रत्येक संभाव्य लाचखोरी आणि भ्रष्टाचाराच्या जोखमीसाठी परिपूर्ण मार्गदर्शन प्रदान करीत नाही. लाचखोरी व भ्रष्टाचाराच्या जोखमीबाबत सावध राहणे, आपल्या लाइन मॅनेजरला या जोखमींविषयी माहिती प्रदान करणे आणि आवश्यकतेनुसार कायदेशीर टीम किंवा समूह नीतिशास्त्र आणि अनुपालन ("जीई आणि सी") यांचेकडून पुढील मार्गदर्शन घेणे ही **तुमची जबाबदारी** आहे.

### A. लाचखोरी विरोधी सामान्य प्रतिबंध

तुम्ही **कोणत्याही संस्था किंवा व्यक्तीला प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरित्या (जसे की टीपीआय द्वारे)** लाच देणे, घेणे, मागणे किंवा स्वीकारण्याचा प्रस्ताव मुळीच देऊ नये.

### B. सरकारी अधिकाऱ्यांना लाच देण्याविरूद्ध प्रतिबंध

सर्व परिस्थितीत लाच देणे पूर्णपणे निषिद्ध आहे परंतु **सरकारी अधिकाऱ्यांशी** होणाऱ्या संवादादरम्यान लाचखोरीचा धोका वाढतो. सरकारी अधिकाऱ्यांमध्ये मर्यादेशिवाय पुढील लोकांचा समावेश होतो:

- कोणत्याही राष्ट्रीय, स्थानिक किंवा महानगरपालिका सरकारमध्ये (उदा. विधायक, प्रशासकीय किंवा अन्यथा) किंवा कोणत्याही नियामक एजन्सीमध्ये, विनिमय किंवा लिस्टिंग प्राधिकरणामध्ये कोणत्याही प्रकारचे पदावर असलेले व्यक्ती (निवडलेले किंवा नियुक्त असेल);
- कोणत्याही राष्ट्रीय, स्थानिक किंवा महानगरपालिका सरकारच्या कोणत्याही शाखेत किंवा सार्वजनिक प्राधिकरणासाठी किंवा त्यांच्यावतीने सार्वजनिक कार्य करणारे लोक;
- कोणत्याही राज्याच्या मालकीच्या संस्थेचे अधिकारी, कर्मचारी किंवा प्रतिनिधी ("एसओई");

- कोणत्याही सरकारी आंतरराष्ट्रीय संस्था किंवा गैर-सरकारी संस्थांचे ("एनजीओ") अधिकारी, कर्मचारी किंवा प्रतिनिधी;
- कोणत्याही न्यायालयीन अधिकार क्षमतेमध्ये काम करणाऱ्या व्यक्ती; आणि
- कोणत्याही राजकीय पक्षाचे राजकारणी, राजकीय उमेदवार किंवा कर्मचारी.

### C. सुविधांचे पेमेंट करणे

तुम्ही **कोणत्याही प्रकारच्या सुविधांचे पेमेंट करू नये**, मग प्रत्यक्ष असो किंवा अप्रत्यक्षरित्या (म्हणजेच दुसरी व्यक्ती किंवा कंपनीद्वारे), जरी ती एखाद्या विशिष्ट देशात सामान्य व्यावसायिक प्रथा असली तरीही. जर एखाद्या सरकारी अधिकाऱ्याने तुम्हाला सुविधांचे पेमेंट करण्यास सांगितले तर तुम्ही या धोरणाच्या अनुषंगाने त्याबाबत अहवाल देणे आवश्यक आहे.

### D. भेटवस्तू, आदरातिथ्य आणि धर्मादाय देणगी धोरणाच्या अनुपालनाची आवश्यकता

तुम्ही ज्या सर्व **भेटवस्तू, आदरातिथ्य** किंवा **धर्मादाय देणग्या** देता किंवा प्राप्त करता त्या सर्वांसाठी या धोरणाचे आणि जेएमच्या जीएच आणि सी धोरणाचे (आणि कोणतेही लागू स्थानिक धोरण परिशिष्ट) पालन करणे आवश्यक आहे.

### E. राजकीय योगदानांविरूद्ध प्रतिबंध

जर जीएमसीने स्पष्टपणे अग्रिम स्वरूपात व लिखित स्वरूपात अधिकृत केले नसेल तर तुम्ही जेएमच्या निधीचा वापर राजकीय देणग्यांसाठी मुळीच करू नये. राजकीय योगदानांमध्ये मर्यादेशिवाय राजकीय उमेदवार, राजकीय पक्ष किंवा राजकीय पक्ष / कृती समित्यांना दिली जाणारी योगदाने समाविष्ट आहेत. तुमची देणगी किंवा योगदान हे राजकीय योगदान आहे किंवा नाही याबद्दल तुम्हाला खात्री नसल्यास तुम्ही कायदेशीर टीमचा किंवा जीई आणि सीचा सल्ला घ्यावा.

### F. टीपीआयसोबत सहभागी होताना आणि पेमेंट करतानाच्या आवश्यकता

जेएमचे प्रतिनिधीत्व करण्यास किंवा त्यांना किंवा त्यांच्या वतीने सेवा प्रदान करण्यास नियुक्त केलेल्या टीपीआयच्या लाचखोरी व भ्रष्टाचाराच्या जोखमींचे तुम्ही नेहमी मूल्यांकन करणे आवश्यक आहे आणि आपल्या लाइन व्यवस्थापकाला या जोखमींची माहिती प्रदान करणे आवश्यक आहे. जर टीपीआय जेएमच्या सहभागी उच्च-जोखीम तृतीय पक्ष मध्यस्थ प्रक्रिया (2017) किंवा तृतीय पक्ष मध्यस्थ जोखीम पुनरावलोकन (2014) च्या कार्यक्षेत्रात येत असेल तर लागू प्रक्रियेच्या आवश्यकतांचे पालन करणे आवश्यक आहे.

### G. वास्तविक किंवा संशयित उल्लंघने किंवा धोक्याच्या शक्यता (रेड फ्लॅग्ज) विषयी अहवाल देण्याची आवश्यकता

**i. तुम्ही या धोरणाच्या ज्ञात किंवा संशयित उल्लंघनांचा अहवाल देणे आवश्यक आहे.**

जर तुम्हाला या धोरणाचे उल्लंघन आढळले, त्याबद्दल माहिती मिळाली किंवा अशा उल्लंघनाचा संशय असेल किंवा अन्यथा त्यामुळे जेएमवर लाचखोरी किंवा भ्रष्टाचाराचा आळ येणार असेल तर त्याविषयी तुम्ही कायदेशीर टीम, जीई आणि सी किंवा स्पीक अप प्रक्रियेद्वारे जेएमला सूचित करणे आवश्यक आहे.

लाचखोरी आणि भ्रष्टाचाराच्या धोक्याच्या सूचनांची (रेड फ्लॅग्ज) एक अपरिपूर्ण यादी परिशिष्ट 1 मध्ये दिलेली आहे.

**ii. तृतीय पक्षाचा समावेश असलेल्या लाचखोरी किंवा भ्रष्टाचाराच्या धोक्याच्या सूचनांचा (रेड फ्लॅग्ज) तुम्ही अहवाल देणे आवश्यक आहे.**

तृतीय पक्षासोबत सहभागादरम्यान (किंवा प्रस्तावित संबंधादरम्यान) उद्भवणाऱ्या कोणत्याही धोक्याच्या सूचनांविषयी (रेड फ्लॅग्ज) तुम्हाला माहिती मिळाल्याबरोबर तुम्ही कायदेशीर टीमला अहवाल देणे आवश्यक आहे. लाचखोरी किंवा भ्रष्टाचाराच्या शंकेमुळे तृतीय पक्षासोबत काम न करण्याचा (किंवा काम करणे जारी ठेवण्याचा) निर्णय घेतल्यास कायदेशीर टीमने जीई आणि सीला तसे कळविणे आवश्यक आहे जेणेकरुन जेएम ग्रुपच्या रजिस्टर / वॉचलिस्टमध्ये निर्णय नोंदविला जाऊ शकेल.

## 4 अपवाद

**स्पष्ट हानीच्या प्रसंगी केलेले पेमेंट**

JM

जेव्हा तुम्हाला किंवा इतर कामगाराला हानी पोहोचण्याची स्पष्ट शक्यता दिसते जसे की जर पेमेंट केले नाही तर प्राण, स्वातंत्र्य गमावले जाऊ शकते किंवा वैयक्तिक दुखापत होऊ शकते, तर अशा अपवादात्मक प्रसंगी ज्यात अन्यथा पेमेंट केल्यास या धोरणाचे उल्लंघन झाले असते तेव्हा पेमेंट करणे. या धोरणाच्या अपवादाच्या अनुषंगाने जर तुम्ही कोणतीही कृती करण्यापूर्वी (कोणतेही पेमेंट करण्यासह) कायदेशीर टीम किंवा जीई आणि सीला सूचित करण्यास सक्षम नसल्यास त्यानंतर शक्य असेल तेवढ्या लवकर (आपल्या लाइन व्यवस्थापकासह मिळून) त्यांना सूचित केले पाहिजे, या धोरणाच्या अनुषंगाने कोणत्याही व्यवहाराचे दस्तऐवजीकरण केले पाहिजे आणि कोणतेही संबंधित पेमेंट खाती, लेखापुस्तके आणि रेकॉर्डमध्ये अचूक नोंदवले गेले आहे याची खात्री केली पाहिजे.

**या धोरणाला इतर कोणतेही अपवाद नाहीत.**

# 5 दायित्वे आणि जबाबदाऱ्या

## दायित्वे

**या** धोरणाच्या अनुपालनाचे संपूर्ण दायित्व **चीफ एक्झिक्युटिव्हकडे आहे.**

**जीएमसीचा** प्रत्येक सदस्य त्याच्या/तिच्या क्षेत्र किंवा समूह कार्याच्या संदर्भात एबीसी अनुपालनासाठी उत्तरदायी आहे आणि त्याचे प्रदर्शन करण्यास सक्षम असणे आवश्यक आहे. यामध्ये खालील गोष्टी सुनिश्चित करणे समाविष्ट आहेः

- या धोरणाची अंमलबजावणी करण्यास आणि अनुपालनाची खात्री करण्यास क्षेत्र / समूह कार्यामध्ये पुरेशी संसाधने आणि कर्मचारी उपलब्ध आहेत आणि योग्य यंत्रणा आणि सूचना प्रणाली कार्यरत आहे;
- क्षेत्र / समूह कार्य अचूक आणि संपूर्ण आर्थिक नोंदी ठेवत आहे;
- क्षेत्र / समूह कार्याशी संबंधित कामगारांना संपूर्ण नियुक्त एबीसी प्रशिक्षण दिले जात आहे;
- एबीसी जोखमी सोडविण्यासाठी यथायोग्य व कार्यात्मक नियंत्रणे क्षेत्र / समूह कार्यातील संबंधित कामगारांनी समजली आहेत आणि लागू केली आहेत;
- अनुपालनाचे मूल्यांकन करण्यासाठी जेएमच्या प्रणाली आणि प्रक्रियांची नियमितपणे क्षेत्र / समूह कार्यामध्ये चाचणी घेतली जाते.

क्षेत्र / समूह कार्याच्या आपल्या जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी आणि या धोरणासाठी त्यांच्या दायित्वाच्या अंमलबजावणीत मदतीसाठी जीएमसीचा प्रत्येक सदस्य प्रतिनिधीची नेमणूक करू शकतो.

## जबाबदाऱ्या

**सर्व कामगार** (संरक्षणाची पहिली फळी)

- हे धोरण वाचतील आणि विनंती केली असेल तेथे कोणतेही संबंधित एबीसी प्रशिक्षण पूर्ण करतील; आणि
- या धोरणानुसार एबीसी शंका आणि प्रश्न उपस्थित करतील.

**सर्व संबंधित कर्मचारी** (संरक्षणाची पहिली फळी)

- या धोरणात, प्रस्थापित सिद्धांत आणि आवश्यकतांना अनुसरूनच तृतीय पक्षांशी संबंध ठेवले जातील याची खात्री करतील;
- या धोरणाच्या अनुषंगाने लाचखोरी व भ्रष्टाचाराविषयी सूचना नोंदवतील; आणि
- हे धोरण लागू करणाऱ्या कोणत्याही विशिष्ट क्षेत्र / समूह कार्य प्रक्रियेचे, कोणत्याही स्थानिक पूरक धोरणाचे आणि अतिरिक्त स्थानिक कायदेशीर आवश्यकतांचे पालन करतील.

**प्रत्येक क्षेत्र/संबंधित समूह कार्य** (संरक्षणाची दुसरी फळी)

JM

- क्षेत्र/समूह कार्यामधील सर्व संबंधित कामगारांची ओळख पटवते;
- क्षेत्र / समूह कार्यासोबत धोरण एकरूप करते, क्षेत्र / समूह कार्यामधील सर्व संबंधित कामगारांनी कोणतेही अपेक्षित एबीसी प्रशिक्षण पूर्ण केले आहे आणि कमीतकमी पाच वर्षांच्या कालावधीसाठी सध्याचा प्रशिक्षण रेकॉर्ड राखले आहे हे सुनिश्चित करते;
- लाचखोरी आणि भ्रष्टाचारामध्ये जेएमचा सहभाग रोखण्यासाठी कोणतीही लागू सावधगिरी आणि आर्थिक नियंत्रणे तयार करते / संयोजित करते;
- टीपीआयला केल्या जाणाऱ्या पेमेंटची निगराणी करणारे योग्य आंतरिक नियंत्रण राखते;
- लेखापुस्तके, रेकॉर्ड आणि खाती अचूक राखते; आणि
- लाचखोरी किंवा भ्रष्टाचाराच्या कारणास्तव नाकारलेल्या तृतीय पक्षांविषयी जीई आणि सीला सूचित करते.

**प्रत्येक क्षेत्र / कार्य जीसी**

- या धोरणाची अंमलबजावणी योग्यता आणि आवश्यकतांविषयी सल्ला देते;
- या धोरणाच्या अंमलबजावणीमुळे उद्‌भवलेल्या कोणत्याही प्रश्न किंवा समस्येविषयी आवश्यकतेनुसार जीई आणि सी ला कळवते;
- क्षेत्र / कार्यातील सर्व संबंधित कर्मचाऱ्यांना वेबिनारद्वारे किंवा प्रत्यक्ष एबीसी प्रशिक्षण प्रदान करण्यास समन्वय साधते;
- या धोरणाविषयी संबंधित कामगारांना प्रशिक्षित करते जेणेकरून त्यांना गरजेप्रमाणे एबीसी जोखीम आणि या धोरणाच्या आवश्यकतांची जाणीव असेल; आणि
- वेबिनार किंवा प्रत्यक्ष प्रदान केलेल्या सर्व जीएच आणि सी प्रशिक्षणाचे कमीतकमी पाच वर्षांच्या कालावधीसाठी रेकॉर्ड ठेवते.

या धोरणांतर्गत आपली जबाबदारी पार पाडण्यासाठी प्रत्येक क्षेत्र / कार्य जीसी प्रतिनिधींची नेमणूक करू शकतात.

**समूह प्रमुख, नीतिशास्त्र आणि अनुपालन** (संरक्षणाची दुसरी फळी)

- जेएमला आणि त्यांच्या संबंधित कर्मचाऱ्यांना या धोरणांतर्गत आणि लागू एबीसी कायद्यानुसार त्यांची दायित्वे काय आहेत हे सूचित करतो आणि सल्ला देतो;
- या धोरणाचे आणि लागू असलेल्या एबीसी कायद्याचे पालन करण्यावर देखरेख ठेवतो;
- एबीसी प्रशिक्षण साहित्य तयार करतो आणि कायम ठेवतो आणि संबंधित कामगारांना प्रशिक्षण उपलब्ध असल्याचे सुनिश्चित करतो;
- प्रदान केलेल्या सर्व ऑनलाईन एबीसी प्रशिक्षणाचे किमान पाच वर्षांच्या कालावधीसाठी रेकॉर्ड ठेवतो;
- जेएमचा एबीसी अनुपालन कार्यक्रम लागू करतो आणि त्याचे व्यवस्थापन करतो;
- लाचखोरी किंवा भ्रष्टाचाराच्या कारणास्तव नाकारलेल्या तृतीय पक्षांचे समूह रजिस्टर/वॉचलिस्ट बनवून ठेवतो;
- कायदेशीर जोखीम समितीने मंजूर केलेल्या उच्च-जोखीम टीपीआयचे समूह रजिस्टर ठेवतो; आणि
- जेएम सामील असण्याची संभावना असू शकणाऱ्या लाचखोरी आणि भ्रष्टाचार प्रकरणांचे अन्वेषण करण्याचे काम करत असणाऱ्या कोणत्याही संबंधित अधिकार यंत्रणेसाठी अंतर्गत संपर्क बिंदू म्हणून काम करतो.

या धोरणांतर्गत आपली जबाबदारी पार पाडण्यासाठी समूह प्रमुख, नितीमत्ता व अनुपालन कदाचित प्रतिनिधींची नेमणूक करू शकतात.

**जेएम कॉर्पोरेट हमी आणि जोखीम** (संरक्षणाची तिसरी फळी)

JM

- पहिल्या व दुसऱ्या या दोन्ही संरक्षण फळ्यातील प्रक्रियांची व नियंत्रणांची रचना आणि परिणामकारकता यावर लक्ष ठेवतो आणि जीएमसी व जेएम पीएलसी संचालक मंडळ यांना आश्वासन प्रदान करतो.

## 6 महत्त्वाची नियंत्रणे

| ***प्रमुख जोखीम*** | ***प्रमुख नियंत्रणे*** |
|---|---|
| ग्राहकांना, संभाव्य ग्राहकांना आणि / किंवा सरकारी अधिकाऱ्यांना अनुकूलता मिळवण्यासाठी आणि / किंवा निर्णय घेण्यावर प्रभाव पाडण्याचा प्रयत्न करण्यासाठी पेमेंट किंवा मूल्यवान वस्तूंची तरतूद. | **प्रशिक्षण**<br><br>• सर्व संबंधित कामगारांनी नियतकालिक प्रत्यक्ष / वेबिनार प्रशिक्षणासहित वार्षिक ऑनलाइन एबीसी जागरूकता प्रशिक्षण घेणे आवश्यक आहे ज्यात विशिष्ट संदर्भात एबीसी जोखमी आणि या धोरणाचे व जीएस आणि सीचे सिद्धांत सामावलेले आहे.<br><br>• प्रत्येक क्षेत्र / समूह कार्य प्रशिक्षणाच्या अचूक नोंदी ठेवते.<br><br>**एस्केलेशन प्रोसेस (वरच्या स्तरावर नेण्याची प्रक्रिया)**<br><br>कोणत्याही टप्प्यावर कामगारांनी लाचखोरी व भ्रष्टाचाराच्या धोक्याच्या शक्यता (रेड फ्लॅग्ज) ओळखल्या असल्यास क्षेत्र आणि समूह कार्यात प्रस्थापित आणि दस्तऐवजीकृत एस्केलेशन प्रोसेस (वरच्या स्तरावर नेण्याची प्रक्रिया) आहे.<br><br>**जीएच आणि सी धोरण**<br><br>जीएच आणि सी ची तरतूद, आश्वासन आणि प्राप्तीच्या संदर्भात जीएच आणि सी धोरणात विशिष्ट मंजुरी आणि रेकॉर्डिंग आवश्यकता समाविष्ट आहे. |
| जेएमसाठी व्यवसाय मिळवण्यासाठी अनुकूल निर्णयासाठी व निर्णय प्रक्रियेला प्रभावित करण्यासाठी सरकारी अधिकारी आणि इतर संभाव्य ग्राहकांना टीपीआय पेमेंट करतात. | **सावधगिरी**<br><br>जॉन्सन मॅथे ग्रुप - उच्च-जोखमीच्या तृतीय-पक्ष मध्यस्थांसोबत सहभाग (2017) आणि 2014 तृतीय पक्ष मध्यस्थ जोखीम पुनरावलोकनाच्या अनुषंगाने जारी देखरेखीच्या अधीन राहून योग्य प्रतीक्षा कालावधी, सावधगिरी आणि देखरेखीतंर्गत टीपीआय असणे आवश्यक आहे. |
| पूर्वी लाचखोरी किंवा भ्रष्टाचाराच्या शंकांमुळे नाकारले गेलेले टीपीआय नंतर नाकारल्याची माहिती नसल्याने जेएमसोबत पुन्हा कार्यरत होतात. | **वॉचलिस्ट ठेवा**<br><br>कायदेशीर टीमच्या सदस्यांनी लाचखोरी किंवा भ्रष्टाचाराच्या शंकांमुळे नाकारलेल्या टीपीआयविषयी जीई आणि सीला कळविणे आवश्यक आहे जेणेकरून त्यांना समूह नोंदणी / वॉचलिस्टमध्ये समाविष्ट करता येईल, टीपीआयसोबत कार्यरत होण्यापूर्वी यांचा संदर्भ घेणे आवश्यक आहे. |

| | |
|---|---|
| जेएम निधींचा वापर लाचखोरी किंवा भ्रष्टाचाराशी संबंधित कारणांसाठी केला जातो. | **जेएमच्या किमान आर्थिक नियंत्रणांचे पालन**<br><br>वित्त विभागाने किमान आर्थिक नियंत्रण मानकाचे पालन केलेच पाहिजे व वित्त विभागातील संबंधित कर्मचाऱ्यांनी जेएमच्या किमान आर्थिक नियंत्रणात दिलेल्या आर्थिक नियंत्रणांचे पालन केले पाहिजे |

## 7 उल्लंघनांचे परिणाम

***उल्लंघनाचे परिणाम***

या धोरणाचे (ज्यात मॅन्युअल समाविष्ट आहे) आणि कोणत्याही लागू स्थानिक परिशिष्टाचे पालन करण्यात असफल ठरल्यास हा शिस्तभंगाचा गुन्हा असेल आणि याचा परिणाम शिस्तभंगात्मक कारवाईत, ज्यात कामावरून काढून टाकणे समाविष्ट आहे, होऊ शकतो. गंभीर प्रकरणात, कर्मचाऱ्यांकडून करण्यात आलेले उल्लंघन गुन्हेगारी अपराध ठरू शकतो आणि याचे पर्यवसान कायदा अंमलबजावणी यंत्रणेद्वारा त्या कर्मचाऱ्याविरुद्ध आणि/किंवा जेएम विरुद्ध कारवाई करण्यात होऊ शकते.

***शंका उपस्थित करणे***

या धोरणाच्या कोणत्याही प्रत्यक्ष, आरोपित किंवा संशयित उल्लंघनाबद्दलच्या शंका, जॉन्सन मॅथे ग्रूप स्पीक अप धोरण 2016 मध्ये वर्णन केल्याप्रमाणे अनेक माध्यमातून उपस्थित करता येतात, ती माध्यमे खालीलप्रमाणे आहे:

- तुमचे लाइन व्यवस्थापक किंवा एचआर व्यवस्थापक;
- समूहाच्या कायदेशीर किंवा समूहाच्या नितीमत्ता आणि अनुपालन टीमचा कोणताही सदस्य;
- द स्पीक अप लाइन; किंवा
- निनावी ईमेल.

चिंता उपस्थित केल्यामुळे किंवा तपासात साहाय्य केल्यामुळे, बदला किंवा एखाद्याच्या विरुद्ध भेदभावाच्या कोणत्याही दाव्यांना जेएम अतिशय गंभीरपणे घेते. जे व्यक्त करून योग्य कृती करतात त्यांचे रक्षण करण्यासाठी आवश्यक असेल तेथे, आम्ही अनुशासनात्मक कारवाई करून बदला घेण्याचे प्रकरण हाताळतो.

***अन्वेषणे***

या धोरणाच्या उल्लंघनाशी संबंधित कोणत्याही शंकांचे अन्वेषण व आवश्यक समन्वय हा समूह प्रमुख, नीतिमत्ता व पालन (Group Head, Ethics & Compliance) यांच्याकडून करण्यात येईल, ते जनरल कौन्सिल आणि कंपनी सचिव (General Counsel & Company Secretary) यांना रिपोर्ट करतील.

## 8 संदर्भ

आचारसंहिता: योग्य कृती करणे

हितसंबंधांचे संघर्ष मार्गदर्शन

उच्च-जोखमीच्या तृतीय-पक्ष मध्यस्थांसोबत सहभाग (2017)

आर्थिक गुन्हेविषयक धोरण (Financial Crime Policy)

## 9 धोरणाचा मालक

या धोरणाची मालकी जनरल कौन्सिल आणि कंपनी सचिवांकडे आहे.

## 10 दस्तऐवज नियंत्रण (Document Control)

| दस्तऐवज नियंत्रण (Document Control) | |
|---|---|
| **आवृत्ती क्रमांक** | 2.0 |
| **संदर्भ** | लागू नाही |
| **मंजुरी मंडळ** | एक जेएम धोरण समिती |
| **जारी करण्याची तारीख** | 20 फेब्रुवारी 2020 |
| **समाप्ती दिनांक (लागू असल्यास)** | लागू नाही |
| **धोरण लेखक** | रिबेका कोलमन |
| **वर्गीकरण** | अंतर्गत |

### उजळणी इतिहास

| आवृत्ती क्रमांक | प्रकाशनाची तारीख | बदलांचा सारांश |
|---|---|---|
| | | |
| | | |

## 11 व्याख्या

| | |
|---|---|
| **लाचखोरी** | एखाद्या अयोग्य कृत्यासाठी आमिष किंवा बक्षिस म्हणून पैसे किंवा मूल्य असलेले काहीही देणे किंवा घेणे. "मूल्य असलेले काहीही" ज्यात मर्यादेशिवाय खालील गोष्टींचा समावेश आहे:<br>• भेटवस्तू (रोखीच्या समतुल्य जसे की भेटवस्तू कार्ड)<br>• अनुकूल करार<br>• आतिथ्य, जसे की जेवण, हॉटेलमध्ये मुक्काम, तिकिटे किंवा क्रीडा किंवा सांस्कृतिक कार्यक्रमांना आमंत्रणे<br>• इतर प्रोमोशनल खर्च (जसे की प्रवास आणि निवास खर्च)<br>• प्राप्तकर्त्यास मूल्य असणारी मेहेरनजर (जसे की थेट सहभागी पक्षासाठी किंवा पक्षाच्या एखाद्या नातेवाईकासाठी नोकरीचा प्रस्ताव)<br>• कंपनी सेवा, सुविधा किंवा मालमत्तेचा विनामूल्य वापर<br>• राजकीय योगदाने<br>• धर्मादाय देणग्या |

JM

| | |
|---|---|
| **धर्मादाय देणगी** | आर्थिक किंवा गैर-आर्थिक भेटवस्तूंच्या स्वरूपात ऐच्छिक परोपकारी योगदाने आणि अव्यावसायिक प्रायोजकत्व, ज्यासाठी कोणतेही परतावा पेमेंट किंवा सेवा अपेक्षित नसते किंवा केलेली नसते. |
| **भ्रष्टाचार** | खासगी फायद्यासाठी सरकारी कार्यालय किंवा अधिकारांचा गैरवापर किंवा व्यवसायाच्या संबंधात खाजगी अधिकारांचा गैरवापर. भ्रष्टाचार अनेक स्वरूपात असू शकतो जसे की फसवणूक, खंडणी, सुविधांचे पेमेंट किंवा लाचखोरी. |
| **एस्केलेशन प्रोसेस (वरच्या स्तरावर नेण्याची प्रक्रिया)** | जर लाचखोरी किंवा भ्रष्टाचाराच्या शंका किंवा रेड फ्लॅग्ज ओळखले असल्यास या धोरणात नमूद केल्यानुसार त्याविषयी सूचित केले जाणे आवश्यक आहे. संशयित किंवा धोक्याच्या शक्यतांचे (रेड फ्लॅग्ज) मूल्यांकन केले जाईल आणि जेथे योग्य असेल तेथे अन्वेषण केले जाईल. |
| **सुविधांचे पेमेंट** | अनधिकृत पेमेंट किंवा भेटवस्तू असतात जे एखाद्या सरकारी अधिकाऱ्याकडून आवश्यक सरकारी कृती किंवा प्रक्रिया वेगाने किंवा सुविधाजनक पद्धतीने करवून घेण्यासाठी दिले जाते. या सरकारी कृती किंवा प्रक्रियेत मर्यादेशिवाय परवाने किंवा परवानग्या देणे, वेळापत्रकांचे नियोजन आणि माल लोड / अनलोड करण्यासह इतर अनेक गोष्टींचा समावेश होतो. |
| **भेटवस्तू** | सर्व उत्पादने, सेवा, रोख किंवा रोखीचे समकक्ष (जसे की चेक, ट्रॅव्हलर चेक्स, गिफ्ट कार्ड्स, व्हाउचर्स, कर्ज आणि शेअर्स) आणि सर्व व्यवसाय सौजन्ये, ग्रॅच्युइटीज, सूट, अनुकूलता आणि इतर कोणत्याही मूल्यवान वस्तू - नाममात्र असल्या तरीही - ज्यासाठी प्राप्तकर्ता उचित मूल्य प्रदान करीत नाही. |
| **जीएमसी** | समूह व्यवस्थापन समिती. |
| **समूह कार्य** | लाचखोरी आणि भ्रष्टाचाराला सामोरे जाण्यासाठी संभाव्य वाढीव जोखमीसह समूह कार्य, ज्यात मर्यादेशिवाय खालील गोष्टींचा समावेश आहे: समूह वित्त, समूह लेखापालन, समूह कर आणि महसूल, समूह खरेदी, समूह कायदा आणि समूह एचआर. |
| **आतिथ्य** | सर्व जेवण, पेय, करमणूक (यात मर्यादेशिवाय खेळाचे किंवा सांस्कृतिक कार्यक्रमांचे तिकिट किंवा आमंत्रणे सामील आहे), करमणूक, प्रवास, निवास (जसे की हॉटेलमधील मुक्काम) आणि इतर शिष्टाचार - नाममात्र असले तरीही - ज्यासाठी प्राप्तकर्ता उचित मूल्य प्रदान करीत नाही. |
| **अयोग्य कृती** | सामान्यपणे कुणीतरी असे कार्य किंवा कृती करण्याकडे (किंवा करण्यात अयशस्वी राहणे) निर्देश केला जातो जी बेकायदेशीर, अनैतिक, चुकीच्या उद्देशाने किंवा विश्वासभंगाच्या स्वरूपात केली जाते. |
| **जेएम** | जॉन्सन मॅथे, या धोरणाच्या कलम 1 मध्ये परिभाषित केल्यानुसार. |
| **कायदा विभागाची टीम** | संबंधित क्षेत्र / कार्याच्या कायदेशीर टीमचा कायदेशीर सल्लागार. |
| **स्थानिक धोरण पुरवणी** | संबंधित देशातील धोरणाला लागू असलेली कोणतीही स्थानिक पुरवणी. |
| **किमान आर्थिक नियंत्रणे** | समूह वित्त ठेवणाऱ्या अंतर्गत वित्तीय नियंत्रणाची कार्यपुस्तिका. |
| **राजकीय योगदान** | यात समावेश आहे, मर्यादेशिवाय राजकीय उमेदवार, राजकीय पक्ष किंवा राजकीय पक्ष / कृती समित्यांना दिली जाणारी योगदाने. |

| | |
|---|---|
| **सरकारी अधिकारी** | यात समावेश आहे (परंतु त्यांच्यापुरतेच मर्यादित नाही):<br><br>• कोणत्याही राष्ट्रीय, स्थानिक किंवा महानगरपालिका सरकारमध्ये कोणत्याही प्रकारची (जसे की विधायक, प्रशासकीय, लष्करी किंवा न्यायालयीन) पदे भूषविणाऱ्या व्यक्ती (निवडलेल्या किंवा नियुक्त केलेल्या);<br>• कोणत्याही राष्ट्रीय, स्थानिक किंवा महानगरपालिका सरकारच्या कोणत्याही शाखेत किंवा सार्वजनिक प्राधिकरणासाठी किंवा त्यांच्यावतीने सार्वजनिक कार्य करणारे लोक;<br>• सरकारी / राज्य सरकारच्या-मालकीचे किंवा नियंत्रित व्यावसायिक उपक्रम ("एसओई"), सार्वजनिक आंतरराष्ट्रीय संस्था, स्वयंसेवी संस्था किंवा कोणत्याही नियामक एजन्सीचे प्रतिनिधी, विनिमय किंवा सूची प्राधिकरणाचे अधिकारी, कर्मचारी किंवा प्रतिनिधी; आणि<br>• कोणत्याही राजकीय पक्षाचे राजकारणी, राजकीय उमेदवार किंवा कर्मचारी. |
| **संबंधित कामगार** | कामगार जेः<br><br>• भेट / आदरातिथ्य देतात किंवा प्राप्त करतात;<br>• प्रदान केलेल्या, मिळालेल्या किंवा प्रस्तावित भेटी / आतिथ्य मंजूर करण्याची ज्यांच्यावर जबाबदारी आहे;<br>• ग्राहकांना जेएमची उत्पादने / सेवांची विक्री करण्याची ज्यांच्यावर जबाबदारी आहे;<br>• जेएमला उत्पादने / सेवा पुरविण्यासाठी विक्रेते / पुरवठादारांची निवड करण्याची ज्यांच्यावर जबाबदारी आहे;<br>• टीपीआयच्या सावधगिरीत सामील असतात आणि/किंवा सहभागी होतात;<br>• ज्यांचा टीपीआयशी नियमित संपर्क असतो;<br>• जे टीपीआयशी संबंधित आर्थिक माहिती हाताळतात; किंवा<br>• ज्यांना अन्यथा त्यांना दिलेले काम करतांना धोक्याच्या शक्यतांना (रेड फ्लॅग्जना) तोंड द्यावे लागू शकते म्हणून त्यांना ओळखले गेलेले असते. |
| **राज्याच्या मालकीची संस्था / एसओई** | कोणताही सरकारी / राज्य सरकारच्या-मालकीचा किंवा नियंत्रित व्यावसायिक उपक्रम ("एसओई" ची संकल्पना विस्तृतपणे स्पष्ट केली आहे, ज्यात कंपनीच्या मालकी, नियंत्रण, हेतू आणि क्रियाकलापांच्या विश्लेषणाची आवश्यकता असते). |
| **तृतीय पक्ष / तृतीय पक्ष** | वास्तविक किंवा संभाव्य ग्राहक, वस्तू व सेवेचा पुरवठा करणारे, टीपीआय किंवा जेएमसोबत थेट संबंध असलेला इतर कुठलाही तृतीय पक्ष. |
| **तृतीय पक्ष मध्यस्थ / टीपीआय** | जेएमचे प्रतिनिधित्व करण्यास, त्यांच्या वतीने कृती करण्यास किंवा जेएमला सेवा प्रदान करण्यास नियुक्त व्यक्ती किंवा व्यक्तींचा समूह, ज्यात मर्यादेशिवाय एजंट, वितरक, पुनर्विक्रेता, वाहतूक पुरवठादार आणि सरकारी मध्यस्थांचा समावेश होतो. |

JM

# परिशिष्ट 1

## धोक्याच्या शक्यता (रेड फ्लॅग्ज)

तुम्हाला सामोरे जावे लागण्याची शक्यता असणाऱ्या आर्थिक गुन्हा, लाचखोरी आणि भ्रष्टाचार किंवा व्यापार व निर्यात नियंत्रणाशी संबंधित धोक्याच्या शक्यतांची (रेड फ्लॅग्जची) अपरिपूर्ण (नॉन-एग्झॉस्टिव्ह) यादी खाली देण्यात आली आहे. तुमच्या निदर्शनास या किंवा इतर कोणत्याही धोक्याच्या शक्यता (रेड फ्लॅग्ज) आल्या तर तुम्ही त्याबद्दल तुमच्या लाइन व्यवस्थापक आणि कायदा टीमला अहवाल दिला पाहिजे.

**जेएमच्या सावधगिरी प्रक्रियेचे तृतीय पक्षांकडून पालन न होणे**

- जेएमच्या सावधगिरी प्रश्नांच्या प्रतिसादाच्या संदर्भात माहिती उपलब्ध करून देण्यास तृतीय पक्ष नकार देतो किंवा देण्यास नाखूष असतो (किंवा अपुरी, चुकीची किंवा विसंगत माहिती प्रदान करतो).
- जेएमच्या धोरणांचे पालन करण्याबाबत तृतीय पक्ष अवाजवी काळजी व्यक्त करतो.
- जेएमच्या कार्यस्थळावरील किंवा उत्पादन स्थळावरील भेटीसाठी तृतीय पक्ष नाखूष असतो किंवा नकार देतो.

**तृतीय पक्षाची पार्श्वभूमी**

- तृतीय पक्षाकडे वरवर पाहता अर्हता किंवा अनुभव किंवा संसाधने यांचा बहुधा अभाव आहे किंवा त्यांच्या व्यवसायाच्या स्वरूपाचे वर्णन करण्यात अडचण आहे.
- तृतीय पक्षाची स्वामित्व संरचना अनियमित किंवा विनाकारण क्लिष्ट वाटते.
- तृतीय पक्ष हा उच्च जोखमीच्या न्यायक्षेत्रात स्थित आहे (लाचखोरी प्रतिबंधक दृष्टीकोनातून, जॉन्सन मॅथे ग्रुप - उच्च-जोखमीच्या तृतीय-पक्ष मध्यस्थांसोबत सहभाग (2017) आणि आर्थिक गुन्हेगारीच्या दृष्टिकोनातून, जॉन्सन मॅथे ग्रुप - आर्थिक गुन्हे धोरण - मॅन्युअलचे परिशिष्ट 2 पाहा).
- तृतीय पक्ष किंवा त्यांचा पत्ता प्रतिबंधित यादीत असणाऱ्या एखाद्या पक्षाच्या पत्त्यासमान आहे जसे की यूके, ईयू किंवा यूएस यांनी जारी केलेली प्रतिबंधित पक्षांची यादी.
- तृतीय पक्षाची शासन, राजकीय पक्ष किंवा इतर सार्वजनिक अधिकाऱ्यांबरोबर “विशिष्ट नातेसंबंध” असण्याची ख्याती आहे किंवा त्यांची विशेषत: सार्वजनिक अधिकाऱ्याकडून विनंती करण्यात आलेली आहे.
- तृतीय पक्ष अनियमित किंवा संशयास्पद रीतीने पत्रव्यवहार करतो, उदाहरणार्थ वैयक्तिक इ-मेल खात्यांचा वापर करतो (उदा Gmail आणि Hotmail).
- तृतीय पक्षाची (किंवा व्यक्तीची किंवा तृतीय पक्षाशी संबंध असणाऱ्या संस्थेची) पार्श्वभूमी संशयास्पद आहे किंवा तिच्याकडून गुन्हेगारी, मुलकी किंवा नियामक उल्लंघने घडली असण्याची शक्यता असलेल्या बातम्या आहेत.
- कंत्राटी वाटाघाटींची सुरुवात होण्याआधी तृतीय पक्ष भेटवस्तू किंवा आतिथ्याची मागणी करतो किंवा तुम्हाला अवाजवी उदारपणे भेटवस्तू किंवा अमाप पाहुणचार देऊ करतो.

**व्यावसायिक नातेसंबंधाचे किंवा व्यवहाराचे स्वरूप व संरचना**

- यात व्यावसायिक तारतम्य नाही असे वाटण्यासारखा व्यवहार तृतीय पक्ष करू इच्छितो, तो तृतीय पक्षाच्या सांगितलेल्या व्यवसाय नीतीशी विसंगत आहे किंवा तृतीय पक्षासाठी नेहमीपेक्षा वेगळा आहे.
- व्यावसायिक नातेसंबंध अथवा व्यवहार या संदर्भात तृतीय पक्ष टाळाटाळ करतो.
- एका छुप्या उद्देशासाठी एजंट म्हणून तृतीय पक्ष काम करत आहे असे वाटते परंतु तो नाकारतो किंवा कोणतेही वैध व्यावसायिक कारण नसतांना त्या व्यक्ती किंवा संस्थेबद्दल माहिती देण्यास अनिच्छुक असतो.

JM

- कोणतेही वैध व्यावसायिक कारण न देता तृतीय पक्ष एक एजंट, मध्यस्थ, सल्लागार, वितरक किंवा पुरवठादाराची विनंती करतो किंवा वापराची गरज व्यक्त करतो.
- मान्य झालेल्या अटी लिखित स्वरूपात मांडण्यास तृतीय पक्ष नकार देतो किंवा कंत्राट अथवा इतर कागदपत्रांवर गतकाळातील तारीख नोंदण्याची मागणी करतो.
- तृतीय पक्ष सामान्य दस्तऐवजीकरण किंवा रिपोर्टिंगच्या गरजांची टाळाटाळ करण्याच्या उद्देशाने व्यवहारांची संरचना करण्याची विनंती करतो.
- तृतीय पक्षाला जेएमची उत्पादने विकत घेण्यात स्वारस्य आहे परंतु:
    - उत्पादनाच्या कामगिरीच्या वैशिष्ट्यांशी अपरिचित आहे:
    - गंतव्य देशातील तंत्रज्ञानाच्या पातळीशी विसंगत उत्पादन विकत घेत आहे;
    - त्या उत्पादनाच्या अंतिम वापराबद्दल टाळाटाळ करतो; किंवा
    - ते उत्पादन देशात वापरण्यासाठी, निर्यातीसाठी किंवा पुन्हा निर्यात करण्यासाठी आहे याबद्दल टाळाटाळ करतो.

**पेमेंटच्या शर्ती**

- तृतीय पक्ष त्यांचे शुल्क जेएमला थेट रोख पेमेंटद्वारे देऊ करतो.
- तृतीय पक्ष पेमेंटची मागणी रोख रकमेत करतो (किंवा मनी ऑर्डर सारखी समतुल्य रोख).
- तृतीय पक्ष अशी विनंती करतो की त्याला थेट पेमेंट करण्याऐवजी, जेएमशी कोणतेही कंत्राटी नातेसंबंध नसणाऱ्या तृतीय पक्षातर्फे पेमेंट केले जावे.
- तृतीय पक्ष अशी विनंती करतो की पेमेंट अशा देशात, अधिकारक्षेत्रात किंवा भौगोलिक ठिकाणी केले जावे, जे तृतीय पक्षाचे वास्तव्याचे ठिकाण किंवा व्यवसायाचे क्षेत्र यापेक्षा वेगळे आहे किंवा अशा अधिकारक्षेत्रांत करावे जे कर आकारत नाहीत किंवा जे करमुक्त समजले जाते.
- तृतीय पक्षाची एकाच नावाखाली किंवा अनेक नावाखाली अनेक खाती आहेत व मोठ्या संख्येत एका खात्यातून दुसऱ्या खात्यात किंवा इतर तृतीय पक्षाच्या खात्यात, कोणतेही वैध कारण नसताना हस्तांतरण केले जाते.
- तृतीय पक्षाच्या खात्यात स्पष्टीकरण नसणारे किंवा अचानक व बरेच मोठे वायर व्यवहार झालेले आहेत, विशेषत: अशा खात्यात ज्यात आधी खूप कमी व्यवहार झालेले आहेत किंवा जवळ जवळ झालेलेच नाहीत.
- तृतीय पक्षाकडून (उदा सल्लागार किंवा प्रतिनिधी) सरकारी अधिकाऱ्याकडे पाठवलेला पैसा किंवा संपत्ती.

**तृतीय पक्षाच्या इन्व्हॉइस बनवण्याच्या प्रथा**

- जेएमने ज्या संस्थांना आपल्या सेवा थेट दिल्या नाहीत अशा वेगळ्या संस्थांच्या नावे इन्व्हॉइसेस बनवले जावेत अशी विनंती तृतीय पक्ष करतो.
- देण्यात आलेल्या सेवांचे स्वरूप अस्पष्ट करण्याच्या हेतूने बनवण्यात आल्याचा संशय येणाऱ्या पद्धतीने किंवा कोणतेही स्पष्टीकरण न देता दिलेल्या सेवांचे वर्णन बदलण्यास, तृतीय पक्ष जेएमला, इन्व्हॉइसवर दिलेल्या सेवांचे वर्णन बदलण्याची विनंती करतो.
- तृतीय पक्ष जेएमसाठी एका कमिशन किंवा शुल्काच्या पेमेंटचा असा इन्व्हॉइस बनवते ज्यात ती रक्कम देण्यात आलेल्या कथित सेवेसाठी खूप मोठी वाटते.
- एखाद्या पेमेंटसाठी तृतीय पक्ष इन्व्हॉइस किंवा पावती देण्यास नकार देतो किंवा तुम्हाला एखादा असा इन्व्हॉइस किंवा पावती मिळते जी अप्रमाणित दिसते.

**तृतीय पक्षाची कामगिरी**

JM

- तृतीय पक्ष नियमितपणे आपल्या इन्व्हॉइसमध्ये अधिक पेमेंट करतो आणि त्यानंतर त्याने दिलेल्या अतिरिक्त रकमेच्या परतफेडीची विनंती करतो.
- मालाच्या वाहतुकीस मदत करणारा फ्रेट फॉर्वर्डर, एखाद्या क्षेत्रातून मालाच्या वाहतुकीसाठी, दहशतवादी संघटनांना पैसे देत आहे असे संकेत आहेत.
- तुम्हाला माल मिळाला आहे आणि तो माल सोडवण्यासाठी एखाद्या सीमाशुल्क अधिकाऱ्यास लाच किंवा "सुविधा" म्हणून पेमेंट देण्यात आले असेल असा तुम्हाला संशय आहे.
- तृतीय पक्ष बेसुमार किंवा खूपच असामान्य विनंत्या करतो (उदा. खूप मोठ्या प्रमाणात आणि कोणतेही स्पष्टीकरण न देता उत्पादनांची ऑर्डर देणे).
- जेएमच्या नेहमीच्या इन्स्टॉलेशन, प्रशिक्षण किंवा देखभालीच्या सेवांना तृतीय पक्ष नकार देतो.
- जेएम कडून उत्पादने खरेदी करणारा तृतीय पक्ष अस्पष्ट डिलिव्हरी दिनांक, नेहमीच्यापेक्षा वेगळ्या ठिकाणी डिलीव्हरी किंवा फ्रेट फॉर्वर्डर्सना डिलिव्हरी देण्याची विनंती करतो.